



दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले | अंक ६२ वा | मंगळवार १८ जुलै २०२३ | पाने ४ | किंमत ४ रु/-

| Volume 1 | Issue 62 | Date : 18/07/2023 | blow : Tuesday | Page 4 | Price 4


### विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला सुरुवात

# शेतकऱ्यांच्या मुद्यावर विरोधक आक्रमक

मुंबईः राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पडलेल्या फुटीनंतर आजपासून विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला सुरुवात झाली आहे. राष्ट्रवादीच्या फुटीनंतर काहीशा कमकुवत झालेल्या विरोधकांनी आज पहिल्या दिवशी आक्रमकता दाखवली. पावसाने ओढ दिल्याने शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढावले आहे. काँग्रेसचे विधिमंडळ गटनेते बाळासाहेब थोरात यांनी विधानसभेत हा मुद्दा उपस्थित करण्याचा प्रयत्न केला. मात्र, अध्यक्षांनी त्यांना बोलू दिले नसल्याचा आरोप विरोधकांनी केला.

तर, विधान परिषदेत शिवसेना ठाकरे गटाने विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्याविरोधात अविश्वास ठराव आणला. नीलम गोऱ्हे यांना पदावरून हटवण्याच्या मागणीसाठी विरोधकांनी राज्यपालांची भेट घेतली. तर, विधान परिषदेच्या आमदार मनीषा कायंदे यांच्याविरोधातही ठाकरे गट आक्रमक झाला आहे. विधिमंडळाचे कामकाज सुरू होण्यापूर्वी विरोधक असलेल्या महाविकास आघाडीच्या आमदारांनी पायऱ्यांवर सरकारविरोधात घोषणाबाजी केली.

यावेळी काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गटाचे आमदार उपस्थित होते. तर, राष्ट्रवादी काँग्रेसचे कोणतेही आमदार सहभागी झाले नसल्याचे अनेकांच्या भुवया उंचावल्या. मात्र, शरद पवार यांच्या गटातील आमदार काही कारणांनी उपस्थित झाले नसल्याचे सांगण्यात आले.

विधान परिषदेतील ठाकरे गटाचे आमदार निलम गोऱ्हे आणि मनिषा कायंदे यांच्या विरोधात त्यांना अपात्र करण्यासाठी ठाकरे गटाकडून विधान भवन सचिवांना पत्र देण्यात आले आहे. । पान २ वर






## सरकारी केंद्रांवर टोमॅटो ८० रुपये किलो ; देशभरात ५०० हून अधिक ठिकाणी विक्री

नवी दिल्ली : केंद्र सरकारतर्फे सवलतीच्या दरात विकल्या जात असलेल्या टोमॅटोचे दर रविवारपासून प्रतिकिलो ९० रुपयांऐवजी ८० रुपये करण्यात आले. सरकारने दिल्ली एनसीआर परिसरात शुक्रवारपासून फिरत्या वाहनाद्वारे ९० रुपये किलो दराने नागरिकांना टोमॅटो उपलब्ध करून दिले होते. शनिवारी या योजनेत आणखी काही शहरांचा समावेश करण्यात आला.

याबाबत अधिकृतपणे जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सरकारने सवलतीच्या दरात टोमॅटोची विक्री सुरू केल्याने टोमॅटोचे दर कमी होत आहेत. देशात अनेक ठिकाणी अशी विक्री केंद्रे सुरू केली आहेत. देशभरातील पाचशेहून अधिक विक्री केंद्रांचा आढावा घेतल्यानंतर रविवार, १६ जुलैपासून सवलतीचा दर ८० रुपये करण्यात आला आहे. रविवारपासून दिल्ली, नोइडा, लखनौ, कानपूर, वाराणसी, पाटणा, मुझफ्फरपूर आणि आरा येथील अनेक केंद्रांवर नाफेड आणि राष्ट्रीय सहकारी ग्राहक महासंघा (एनसीसीएफ )च्या माध्यमातून टोमॅटोची विक्री सुरू केली आहे, असे निवेदनात स्पष्ट केले आहे. देशभरातील ग्राहकांना दिलासा देण्यास कटिबद्ध असल्याचे सरकारने म्हटले आहे.

## भाजपसोबत जायचा प्रश्नच नाही, लोक येऊन भेटले तरी भूमिकेत बदल होणार नाही : शरद पवार

मुंबई : अजित पवार आणि समर्थक आमदारांनी पुन्हा एकदा शरद पवार यांची अचानक भेट घेतली. या भेटीनंतर राजकीय चर्चेला उधाण आले. पण शरद पवार यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, शरद पवार यांनी भाजपसोबत जाण्यास नकार दिला आहे. अजित पवार आणि समर्थक आमदार शरद पवार यांची मनधरणी करण्यासाठी आज पुन्हा वायबी चव्हाण सेंटर येथे गेले होते. त्यानंतर शरद पवार यांनी आपली भूमिका स्पष्ट केली.

भाजपसोबत जायचा प्रश्नच उद्भवत नाही, अशी भूमिका शरद पवार यांनी घेतली आहे.



लोक येऊन भेटले तरी भूमिकेत बदल होणार नाही, अशी भूमिका शरद पवार यांनी अजितदादा गटाकडे मांडल्याची माहिती मिळाली आहे. अजित पवार आणि समर्थक आमदार सरकारमध्ये सामील झाले. त्यानंतर ते दुसऱ्यांदा शरद पवार यांची भेट घेण्यासाठी आले होते. त्यावेळी त्यांनी शरद पवार यांची मनधरणी करण्याचा प्रयत्न केला. पण शरद पवार यांनी कोणताही प्रतिक्रिया दिली नाही.


अजित पवार, प्रफुल पटेल, सुनिल तटकरे, अनिकेत तटकरे, विक्रम काळे, अतुल बेनके, अमोल मिटकरी, सुनील टिंगरे, सुनील शेळके, दत्तामामा भरणे, संजय शिंदे, अण्णा बनसोडे, संजय बनसोडे, इंद्रनील नाईक, सरोज अहिरे, राजु कारेमोरे या नेत्यांनी शरद पवार यांची वायबी सेंटर येथे जाऊन भेट घेतली.

उपमुख्यमंत्री अजित पवार। पान २ वर

## पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी दोन्ही सभागृहात नवीन मंत्र्यांचा परिचय

मुंबई : विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी विधानसभेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी, तर विधान परिषदेत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह नवीन इतर आठ मंत्र्यांचा सभागृहाला परिचय करून दिला.उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार, अन्न व नागरी पुरवठा छगन भुजबळ, सहकार मंत्री दिलीप वळसे- पाटील, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, कृषीमंत्री धनंजय मुंडे, अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मरावबाबा आत्राम, क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, मदत व पुनर्वसन आणि आपत्ती व्यवस्थापन मंत्री अनिल पाटील यांचा यामध्ये समावेश आहे.

## केरळचे माजी मुख्यमंत्री ओमान चांडी यांचं निधन



केरळ : केरळचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेस नेते ओमन चांडी यांचं मंगळवारी (१८ जुलै) निधन झालं. ते काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यासोबत भारत जोडो यात्रेतही दिसले होते. केरळ काँग्रेसचे अध्यक्ष के. सुधाकरन आणि चांडी यांच्या नातेवाईकांनी मंगळवारी त्यांच्या निधनाची माहिती दिली. काँग्रेसचे दिग्गज नेते म्हणून ओळखले जाणारे ओमन चांडी हे ७९ वर्षांचे होते.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि केरळचे माजी मुख्यमंत्री ओमन चांडी यांचं आज सकाळी निधन झालं. ते ७९ वर्षांचे होते. गेल्या काही महिन्यांपासून त्यांच्यावर बंगळुरूमध्ये उपचार सुरू होते. त्यांच्या मुलानं सोशल मीडिया पोस्टद्वारे ही माहिती दिली. २००४-२००६, २०११-२०१६ या कालावधीत त्यांनी केरळचे मुख्यमंत्री म्हणून काम केलं.

केरळ काँग्रेसचे अध्यक्ष के. सुधाकरन यांनी ट्वीट करून ओमन चांडी यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला. केरळचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते ओमन चांडी यांचं निधन झाल्याचं त्यांनी ट्वीट केलं आहे. प्रेमाच्या बळावर जग जिंकणाऱ्या एका राजाच्या कथेचा मार्मिक शेवट झाल्याचं ट्वीटमध्ये लिहिण्यात आलं आहे. आज एका महापुरुषाच्या निधनानं मला अतिव दुःख झालं आहे. त्यांनी असंख्य व्यक्तींच्या जीवनावर प्रभाव टाकला आणि त्यांचा वारसा कायम आपल्यासोबत राहील.

ओमन चांडी हे बऱ्याच दिवसांपासून आजारी असल्याची । पान २ वर

## देशात पाच वर्षांत १३.५ कोटी नागरिक गरिबीतून बाहेर; नीति आयोगाचा अहवाल

नवी दिल्ली : २०१६ ते २०२३ या पाच आर्थिक वर्षांत देशभरातील १३.५ कोटी नागरिक बहुआयामी दारिद्र्यातून बाहेर आले. आरोग्य, शिक्षण आणि राहणीमानातील सुधारणा यांद्वारे ही मोजणी करण्यात आली असून उत्तर प्रदेश, बिहार आणि मध्य प्रदेशमध्ये सर्वाधिक घट नोंदविण्यात आली आहे. नीति आयोगाच्या अहवालात सोमवारी ही माहिती देण्यात आली.

राष्ट्रीय बहुआयामी गरिबी निर्देशांकाच्या (एमपीआय) दुसऱ्या आवृत्तीनुसार २०१५-१६ मध्ये भारतातील बहुआयामी गरिबांची संख्या २४.८५ टक्के होती. मात्र २०१९-२१मध्ये ती १४.९६ टक्के नोंदविण्यात आली. म्हणजेच पाच वर्षांत बहुआयामी गरिबांच्या संख्यात ९.८९ टक्के लक्षणीय घट झाली आहे. ग्रामीण भागांत दारिद्र्य ३२.५९ टक्क्यांवरून १९.२८ टक्क्यांपर्यंत वेगाने घसरले आहे, तर शहरी भागांत ८.६५ टक्क्यांवरून ५.२७ टक्क्यांपर्यंत गरिबी कमी झाली आहे. २०१५-१६ ते २०१९-२१ दरम्यान विक्रमी १३.५ कोटी नागरिक बहुआयामी दारिद्र्यातून बाहेर आले आहे, असे नीति आयोगाचे उपाध्यक्ष सुमन बेरी यांनी प्रसिद्ध केलेल्या अहवालात म्हटले आहे.

राष्ट्रीय । पान २ वर

### कृषी मंत्र्यांची मोठी घोषणा

## बोगस बियाणे, खते विकणाऱ्यांवर अजामीनपात्र गुन्हा दाखल होणार

मुंबई : राज्यात बोगस बियाणे, खते, कीटकनाशके यांची विक्री करणाऱ्या काही जणांवर अलीकडे कारवाई झाली आहे, मात्र बोगस बियाणे-औषधे विक्री करणाऱ्यांविरोधातील अधिक कडक कायदा करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे. तर चालू पावसाळी अधिवेशनातच बोगसगिरी करणाऱ्यांवर अजामीनपात्र गुन्हा दाखल करण्याचा अधिक कडक कायदा अस्तित्वात आणला जाईल, अशी माहिती राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी आज मुंबई येथे पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवसाचे कामकाज संपल्यानंतर माध्यमांशी बोलताना दिली आहे.



ज्याप्रमाणे बीटी-कापूस बियाण्यांच्या बाबतीत बोगस बियाणे वितरित करणाऱ्यांवर अजामीनपात्र गुन्हा दाखल होतो, त्याच धर्तीवर तोच कायदा अन्य बियाण्यांच्या, खतांच्या व कीटक नाशकांच्या बाबतीतही लागू करण्यात येईल, असा निर्णय घेण्यात आला असल्याचे धनंजय मुंडे म्हणाले. तर राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वात संपन्न झालेल्या मंत्री मंडळाच्या बैठकीत याबाबत निर्णय घेण्यात आला असून, त्यासाठी एक विशेष समितीही स्थापन करण्यात आली असल्याची माहिती धनंजय मुंडे यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

प्रत्येक हंगामात शेतकऱ्यांची बोगस बियाणे देऊन फसवणूक करण्यात आल्याच्या घटना समोर येत असतात. दरम्यान मागील काही दिवसांत कृषी विभागाने केलेल्या कारवाईतून देखील बोगस बियाणे विक्रीचे प्रकार समोर आले आहेत. त्यामुळे आता विक्री करणाऱ्यांविरोधातील अधिक कडक कायदा करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे. दरम्यान असा कायदा अस्तित्वात आणण्यासाठीचे प्रारूप तयार करण्याचे काम सुरू असून, समितीचा निर्णय होताच, चालू पावसाळी अधिवेशनातच हा कायदा लागू करण्यात येईल, असेही धनंजय मुंडे म्हणाले.

## चुकीच्या प्रस्ताव मंजुर करणाऱ्या माहिती आणि जनसंपर्क विभागाच्या अधिकाऱ्यावर कारवाई करा

### अक्कलकोटचे नायब तहसीलदार यांना महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने निवेदन

**अक्कलकोट/प्रतिनिधीः धर्मदाय आयुक्त यांच्याकडे सोसायटी व ट्रस्ट ॲक्ट अंतर्गत नोंदणी असलेल्या सेवाभावी संस्थांनाच, पत्रकार संघटना गृहित धरुन अधिस्वीकृती समितीवर नियुक्ती देण्यात आली आहे.न्यास नोंदणीचा व संघटना नोंदणीचा स्वतंत्र कायदे आणि विभाग आहेत. असे असताना माहिती आणि जनसंपर्क विभागाने थेट पत्रकारांच्या सेवाभावी संस्थांनाच संघटना गृहित धरले आहे.याबाबत चौकशी करुन चुकीचे प्रस्ताव मंजुर करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्यात यांवे या मागणीचे निवेदन अक्कलकोटचे नायब तहसीलदार यांना महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने देण्यात आला.**




महाराष्ट्र शासनाच्या माहिती आणि जनसंपर्क विभागाने ११ जुलै २०२३रोजी राज्य अधिस्वीकृती व विभागीय अधिस्वीकृती समिती गठित करण्याबाबत शासन निर्णय जारी केला आहे. याच आदेशात मराठी पत्रकार परिषद या संघटनेवर धर्मादाय सहआयुक्त पुणे यांनी प्रशासक नियुक्त असल्याचे कळवले असल्याने संघटनेच्या सदस्यांची नियुक्ती मा. उच्च न्यायालयाच्या उक्त निकालाच्या अधिन राहून करण्यात येत असल्याचे केले आहे. समितीवरील एकूण४५ सदस्यापैकी राज्यावर पाच आणि विभागीय समितीवर नऊ असे १४ सदस्य घेण्यात आले आहेत. तर महाराष्ट्र श्रमिक पत्रकार संघटना तीन, महाराष्ट्र संपादक परिषद दोन, मंत्रालय विधीमंडळ वार्ताहर संघ एक, बृह्नमहाराष्ट्र जिल्हा वृत्तपत्र संपादक संघ एक, महाराष्ट्र दैनिक वृत्तपत्र संघटना एक आणि महाराष्ट्र साप्ताहिक वृत्तपत्र संपादक परिषद एक व स्थानिक संघटनांचे काही प्रतिनिधी सदस्य घेण्यात आले आहेत.धर्मादाय आयुक्त यांच्याकडे १८६० सोसायटी आणि १९५० ट्रस्ट कायद्यांतर्गत सेवाभावी संस्थांची नोंदणी केली जाते.तर असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या मानधन, पगार घेणाऱ्या कामगारांसाठी कामगार कायदा (लेबर युनियन ॲक्ट) १९२६ अंतर्गत नोंदणी केली जाते.

कामगार विभागाकडेच संघटनेची नोंदणी करून आपल्या न्याय हक्कांसाठी आंदोलन, मागणी, उपोषण करण्याचा अधिकार मिळतो. सार्वजनिक न्यासा अंतर्गत नोंदणी असलेल्या संस्था या सेवा म्हणुनच काम करतात. सेवाभावी संस्था आणि श्रमिक संघटनांसाठी स्वतंत्र विभाग आणि कायदे आहेत. असे असताना माहिती आणि जनसंपर्क विभागासह सामान्य प्रशासन विभागानेही कोणतीही खातरजमा न करता काही लोकांच्या प्रभावामुळे चुकीच्या पध्दतीने अधिस्वीकृती समितीवर सदस्यांची नियुक्ती केली आहे.त्यामुळे चुकीच्या पध्दतीने संस्थांना संघटना दाखवून सदस्यांची नियुक्ती प्रक्रिया करणाऱ्या अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करावी आणि नियमानुसार कामगार आयुक्त यांच्याकडे कामगार कायद्यांतर्गत नोंदणी असलेल्या संस्थांना प्राधान्य द्यावे.या मागणीचे निवेदन नायब तहसीलदार यांना देण्यात आला.यावेळी तालुका अध्यक्ष कमलाकर सोनकांबळे,सचिव विश्वनाथ चव्हाण,जिल्हा उपाध्यक्ष राजेशकुमार जगताप,चेतन जाधव,बसवराज बिराजदार,स्वामीराव गायकवाड,दयानंद दणूरे,रमेश भंडारी,महेश गायकवाड,समाधान अहिरे,विश्वनाथ राठोड,आनंद चौघुले,गणेश कुलकर्णी,गौतम बाळशंकर,निंगप्पा निंबाळ आदी उपस्थित होते.

## अधिक मासानिमित्त वटवृक्ष मंदिरात भागवत कथेचे आयोजन

### सोलापूरचे सुधाकर इंगळे महाराज भागवत कथेतून करणार निरूपण

अक्कलकोट/प्रतिनिधीः यंदाच्या अधिक मासानिमित्त येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात श्रीमद् भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक १८ जुलै ते २० जुलै २०२३ अखेर सोलापूरचे सुप्रसिद्ध वारकरी संप्रदाय कथाकार ह.भ.प.सुधाकर इंगळे महाराज याप्रसंगी श्रीमद् भागवत कथेचे निरूपण करणार आहेत. देवस्थानच्या ज्योतिबा मंडपात सदरील कालावधीतील तीन दिवस दुपारी ४ ते सायंकाळी ७ या वेळेत ही कथा संपन्न होणार आहे. तरी भाविकांनी श्रीमद् भागवत कथा श्रावणाचा लाभ घ्यावा असे आवाहन मंदिर समितीचे अध्यक्ष महेश इंगळे यांनी केले आहे.

दैनिक
यश सिद्धि न्यूज



## ✻ सुविचार ✻

छटाकभर प्रेम शेरभर ज्ञानापेक्षा वरचढ असते.- जॉन वेरली

## संपादकीय

### आवरणे कठीण होईल..

संपूर्ण देशामध्ये राजकीय तज्ञांना विचार करावा असे महाराष्ट्रातील राजकारण चालू आहे. कधी कोणता विरोधक एकत्र येतो आणि कोण बाहेर जातो हे आता समजणे कठीण झाले आहे. यामध्ये सर्व साधारण मतदार हा एकटा पडला आहे. म्हणून मतदार तर आता केवळ बघ्याचीच भूमिका घेऊ शकतो. नेमके कोणाचे सरकार आहे? कोणत्या उमेदवाराला जिंकून दिले आणि तो सध्या काय करतो? हे सर्व हतबल होऊन पाहण्याशिवाय त्याच्या हाती काही नाही, पण या सर्व डावपेचात ईर्षेने शिवसेनेतील बंडाला हवा देऊन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडीचे सरकार खाली खेचणाऱ्या भाजपची स्थिती आता अवघड झाली आहे असे दिसते. गेल्या वर्षी जूनमध्ये शिवसेनेतील बंडखोर एकनाथ शिंदे यांना बरोबर घेत भाजपने सरकार स्थापन केले. मुख्यमंत्रिपदी एकनाथ शिंदे तर उपमुख्यमंत्रिपदी देवेंद्र फडणवीस विराजमान झाल्यानंतर मंत्रीमंडळाचा पहिला विस्तार होण्यासाठी तब्बल ३९ दिवस लागले. मंत्रिपदाची माळ कोणाच्या गळ्यात घालायची यावर घोडे अडले होते. शपथविधी झाल्यानंतर खातेवाटप पाच दिवसांनी जाहीर झाले. त्यातही भाजपचाच वरचष्मा पाहायला मिळाला, तर दुसरीकडे सर्वोच्च न्यायालयात सत्तासंघर्षाची सुनावणी सुरू होती, ती वेगळी. शिवसेनेसोबत वर्षभरापूर्वी केलेला प्रयोग यशस्वी ठरल्यानंतर भाजपने राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षासाठी तीच मात्रा वापरली. दोन जुलैला अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या आमदारांचा मोठा गट सत्तेत सहभागी झाला. अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली आणि राज्याच्या इतिहासात प्रथमच दोन उपमुख्यमंत्रिपदे निर्माण झाली. त्यांच्या समवेत राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या अन्य आठ आमदारांनी मंत्रिपदाची शपथ घेतली आहे. शिंदे गटातील आमदारांचे दु:ख वेगळेच आहे. पहिल्या मंत्रीमंडळ विस्तारापासून काही जण गुडघ्याला बाशिंग बांधून बसले आहेत. पुढील महिन्यात त्याला एक वर्ष होईल. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटल्याप्रमाणे नवीन सूट शिवून तयार आहे आणि फक्त प्रतीक्षा आहे ती बोलावण्याची. शिवाय गडकरी यांनी आता सरकारमध्ये गर्दी झाली असल्याचे वक्तव्य केल्याने या सर्वांचीच धाकधूक वाढली आहे. यात केवळ शिंदे आणि अजित पवार गटाचेच नव्हे तर भाजपमधीलही इच्छुक आमदार आहेत. सरकारमध्ये या दोन गटांच्या समावेशामुळे सर्वाधिक संख्याबळ असलेल्या भाजपची संधी निम्म्याने कमी झाली हे वास्तव आहे. हे आमदार बंगल्यापासून पालकमंत्रिपदापर्यंत दावा करत आहेत, हे विशेष. पावसाळ्यानंतर निवडणुकांचा मोसम सुरू होईल. शिंदे-फडणवीस सरकारमध्ये सध्या जी काही सुंदोपसुंदी सुरू आहे, विशेषत: शिंदे गट आणि अजित पवार गटात, ती पाहता भाजपला हे आवरणे कठीणच जाईल असे दिसते.

पान १ वरुन

### शेतकऱ्यांच्या मुद्यावर विरोधक

या पत्राला आमदार निलम गोऱ्हे आणि मनिषा कायंदे यांना पुढील १४ दिवसांत उत्तर द्यायचे आहे. संविधानाच्या १० शेड्युलमध्ये जी तरतूद आहेत त्यानुसार आम्ही नोटीस पाठवली असल्याचे शिवसेना ठाकरे गटाचे नेते अनिल परब यांनी सांगितले. उपसभापती यांच्यावर अविश्वास ठराव आहे. अध्यक्ष किंवा सभापती हे पदावर असताना जर अविश्वास असतो तेव्हा त्यांना खुर्चीवर बसण्याचा अधिकार नाही. नीलम गोऱ्हे यांनी खुर्चीवर बसू नये अशी आमची भूमिका असल्याचेही त्यांनी सांगितले. विधान परिषदेत आम्ही जो अभुतपूर्व असा पेच प्रसंग निर्माण झाला आहें. त्यांच्यासमोर त्यांच्या अपात्रतेची आणि अविश्वास प्रस्ताव चालू शकत नाही. त्याबद्दल पत्र दिले. त्यांच्या अपात्रतेची आम्ही नोटीस दिली आहे. अडव्होकेट जनरल याच्याकडून मत घेऊन कारवाई करावी. तोवर त्यांनी समिती नेमावी आणि कामकाज चालवावे अशी आमची मागणी असल्याचे विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी राज्यपालांच्या भेटीनंतर सांगितले.

कॉंग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी शेतकऱ्यांच्या मुद्दा उपस्थित करत सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधला. राज्यातील पावसाची स्थिती गांभीर्याने पाहायची गरज असून, अद्याप ५० टक्के क्षेत्रात पाऊस झालेला नाही. शेतकरी हवालदिल झाला असून, अतिवृष्टी, गारपीट नुकसानीचे अनुदान अजूनही मिळाले नाही. त्यातच बियाणे, खते मोठ्या प्रमाणात बाजारात आलेत. तर सरकारी टोळी हफ्ते वसुली करतायेत, असा आरोप थोरात यांनी केला आहे. आज पहिल्या दिवशी शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत चर्चा व्हायला हवी होती बाळासाहेब थोरात यांनी दुबार पेरणी संदर्भात मुद्दा उपस्थित केला होता. या मुद्यांवर त्यांनी स्थगन प्रस्ताव मांडण्याचा प्रयत्न केला. मात्र कुठल्याही प्रकारची चर्चा होऊ दिली नाही आणि विधानसभेचे कामकाज स्थगित झालं असल्याचे विरोधकांनी म्हटले. राज्यातील जनतेच्या प्रश्नासंदर्भात सरकार हे गांभीर्याने पाहत नाही हे यावरून दिसून येत असल्याची टीका शिवसेनेचे प्रतोद सुनील प्रभू यांनी म्हटले.

राष्ट्रवादी कॉंग्रेसचा एक गट राज्यात सत्तेत सहभागी झाली आहे. तर, दुसरीकडे एक गट अजूनही विरोधी बाकांवर आहे. मात्र, राष्ट्रवादीच्या आमदारांच्या आसन व्यवस्थेत कोणताही बदल झाला नसल्याची माहिती आहे. दरम्यान, आज विधानसभेत आणि विधान परिषदेत नवनिर्वाचित मंत्र्यांची ओळख करून देण्यात आली. त्यानंतर शोक प्रस्ताव मांडण्यात आला आणि दिवसभराचे कामकाज स्थगित करण्यात आले.

## महिला सन्मान योजना आणि अमृत योजनेमुळेष्ठ एस.टी.वेगातष्ठ.!

महाराष्ट्र शासनाच्या अनेक योजना लोक कल्याणकारी ठरतातष्ठ हा आज पर्यंतचा इतिहास आहे. आता यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ७५ वर्षाच्या पुढच्या नागरिकांसाठी एस. टी. महामंडळाच्या बसमध्ये अमृत मोफत प्रवास योजना आणि महिलांसाठी प्रवास भाड्यात ५० टक्के सवलत असलेली महिला सन्मान योजना सुरु केली.

लातूर विभागात एस. टी. महामंडळाला अमृत योजनेंतर्गत एप्रिल ह्व २०२३ मध्ये १३ लाख ६९ हजार १५२ एवढ्या ज्येष्ठ नागरिकांनी प्रवास केला त्यातून ६०७.०५ लाख एवढे उत्पन्न मिळाले, तर माहे मे या महिन्यात १५ लाख ३ हजार ९४९ एवढ्या जेष्ठ नागरिकांनी प्रवास केला यातून ६८८.६७ लाख एवढे उत्पन्न झाले. माहे जूनमध्ये १४ लाख ७५ हजार ५२५ एवढे जेष्ठ आणि त्यातून मिळालेले उत्पन्न ७०७.०८ लाख एवढे आहे.

तर महिला सन्मान योजनेंतर्गत प्रवास भाड्यातील ५० टक्के सवलतीमुळे मोठ्या प्रमाणात महिला प्रवाशांची संख्या वाढली असून लातूर विभागात एप्रिल -२०२३ मध्ये १४ लाख १० हजार ५२९ एवढ्या महिला प्रवाशांनी या योजनेचा लाभ घेतला. यातून ३९३.१६ लाख उत्पन्न मिळाले तर माहे मे महिन्यामध्ये ही महिला प्रवाशांची संख्या वाढून ती १८ लाख १ हजार ६ हजार २१ झाली त्यातून ५६४.८५ लाख उत्पन्न झाले. माहे जून महिन्यामध्ये हा आकडा १५ लाख ८२ हजार ७१६ एवढ्या महिलांनी प्रवास केला त्यातून ४५८.९८ लाख एवढे उत्पन्न लातूर विभागाला मिळाल्याचे लातूर विभाग नियंत्रक अश्वजीत अशोक जानराव यांनी सांगितले.या योजनेचा नेमका काय फायदा झाला हे थेट बस स्थानकात जाऊन लाभधारकांना प्रतिक्रिया विचारल्याष्ठ

**जेष्ठ नागरिकांच्या प्रतिक्रिया**

जेष्ठ नागरिकांसाठी एस.टी. महामंडळाने जी सवलत दिली आहे, त्यामुळे मी पंढरपूर येथील विठ्ठलाचे दर्शनासाठी जावू शकलोष्ठ तसेच मला सोलापूर येथे नियमित उपचारासाठी दवाखान्यात जाण्यासाठी इतर कोणालाही आर्थिक मदत मागण्याची वेळ आली नाही अशी प्रतिक्रिया पंडित हरीभाऊ मोटाडे, रा. दर्जीबारेगाव ता. रेणापूर जि. लातूर यांनी व्यक्त केली.

तर लातूर तालुक्यातील सावरगावचे राहिवाशी सुर्यकांत व्यंकटराव शिंदे म्हणाले, मी एक वारकरी आहे, या प्रवासाची सवलत दिल्यामुळे मला पंढरपूर जाण्यासाठी तसेच महाराष्ट्रातील देवदेवस्थान तसेच मुलां-बाळांकडे, पाहूण्यांकडे जाण्यासाठी, महाराज म्हणून मी ही जनसेवा करीत असतो. इतर गावो-गावी जाण्यासाठी चांगली सोय झाली. सरकाने ही जी योजना काढली आहे,ती चांगली असून यातून वयोवृद्धाची सेवा होत आहे. त्यासाठी मी महाराष्ट्र शासनाचे आभार मानतो.




माझं कुटंब हे पुणे येथे राहते..त्याठिकाणी मी एस टी मोफत झाल्यापासून नियमित जातो. तसेच माझ्या मुलींकडे जाण्याची सोय झाली आहे. गावाकडे येण्या-जाण्यासाठी तसेच ज्योतिबा (कोल्हापूर) , पंढरपूरच्या यात्राला जाऊन आलो. या योजनेचा मी पुरेपूर लाभ घेत असल्याची प्रतिक्रिया श्री. निवृत्ती लिंबाजी पाखरे, हासेगाव ता. लातूर यांनी दिली.

**महिला सन्मान योजनेच्या लाभार्थी महिलांच्या प्रतिक्रिया**

मला तीन मुली आहेत एक कोल्हापूर, एक मुंबई, आणि एक पुण्यात राहतेष्ठ त्या तिघीकडे या सवलतीमुळे मी नियमित जाते. ही सवलत दिल्यामुळे अर्ध्या तिकिटात या सर्व ठिकाणी भेटून येते याचे समाधान असल्याची प्रतिक्रिया लातूर येथे सिध्देश्वर चौक येथे राहणाऱ्या श्रीमती सुषमा लोखंडे यांनी दिली.

लातूर मध्ये नर्सिंगची शिक्षण घेणाऱ्या प्रिया सुतार बालाजी या विद्यार्थिनीने.. पूर्वी कधी तरी जायचे पण आता या ५० टक्के सवलतीमुळे गावांकडे किंवा पाहुण्यांकडे जात असते. सवलत दिल्याने उर्वरित ५० टक्के रक्कम मी माझ्या शिक्षणासाठी वापरत आहे.

दुसऱ्या एक ज्वेलरीचा व्यवसाय करणाऱ्या श्रीमती सोनाली पंकज कोटेजा म्हणाल्या, मी ज्वेलरीचा उद्योग करते. ज्वेलरी एग्जीबिशनसाठी अहमदनगर, बीड, जालना येथे एस.टी. महामंडळाने ५० टक्के प्रवास सवलत दिल्याने मी जावू शकले. यातून जी ५० टक्के रक्कम बचत होणार आहे, ती मी माझ्या उद्योगात लावत आहे.

'मी मेमसाब या ठिकाणी काम करीत असते. मला माझ्या आईकडे ( नांदेड जिल्ह्यात )जाण्यासाठी एस.टी. सवलत मिळाल्याने मी आईकडे किमान दोन वेळा जावू शकले. एस.टी. महामंडळाची ५० टक्के सवलत मिळाल्याने हे शक्य झाले आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासनाचे आभार मानते'' लातूर मध्ये राहणाऱ्या श्रीमती मीना विकास कांबळे यांनी या प्रतिक्रिया दिल्या.

श्रीमती वर्षा शांतीनाथ दुरुगकर, शिरुर अनंतपाळ यांनी मला एस.टी. महामंडळाची ५० टक्के सवलत मिळाल्याने लातूर येथे नियमित दवाखान्यात येवू शकते. त्यामुळे मी वेळेच्या वेळेला दवाखान्यात जावून आरोग्याची काळजी घेवू शकत असल्याची प्रतिक्रिया दिली.

या सर्व प्रतिक्रिया अत्यंत बोलक्या होत्या.महिलांना अर्धे भाडे असल्यामुळे माहेर मुलीकडे जाणे, पाहूणे तसेच छोटे मोठे व्यवसाय करणाऱ्या महिलांना याचा मोठा लाभ होत आहे आणि ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास असल्यामुळे दवाखान्यात येण्यासाठी ,देव देवस्थान दर्शनाला जाण्यासाठी आर्थिक भार नसल्यामुळे सोपे झाले आहे.

अनेकांनी परवाची पंढरपूरची आषाढी यात्रा बसनी केल्याचे सांगितले. या ज्येष्ठासाठीच्या अमृत मोफत प्रवास योजनेमुळे एस. टी.महामंडळाची प्रवासी वाहतुक बस पूर्ण क्षमतेनी भरून जातात तसेच शासनाकडून मिळणाऱ्या परताव्यामुळे एस. टी. चे उत्पन्न वाढते आहे. सर्व अर्थानी ह्या योजना लोकोपयोगी ठरत असल्याचे चित्र आहे.

## भाजपसोबत जायचा प्रश्नच नाही,

गटाकडून शरद पवारांना साकडं घालणं सुरू झालंय. त्यामुळे राज्यातील पदाधिकारी आणि कार्यकर्ते संभ्रमात पडलेत. अजित पवारांना समर्थन देण्यासाठी कार्यकर्ते शंभर रुपयांच्या बॉण्डवर लिहून देतायेत. दुसरीकडे मात्र वेगळ्याच घडामोडी घडत असल्यानं कार्यकर्ते ही बुचकळ्यात पडलेत. पण पवार कुटुंब एकत्र आलं तर आमच्यावरही अशी वेळ येणार नाही, असं ते म्हणतायेत.

शरद पवार यांची भेट घेतल्यानंतर प्रफुल पटेल यांनी प्रसारमाध्यमांशी सवाद साधला. शरद पवार यांच्याशी बातचीत झाली. राष्ट्रवादी एकत्रच ठेवण्याचा प्रस्ताव दिला. पण त्यांनी त्यावर काहीच प्रतिक्रिया दिली नाही. त्यांच्या मनात काय सुरु आहे... हे माहित नाही, असे प्रफुल पटेल म्हणाले.

नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाला सगळेजण मानतात. नरेंद्र मोदी हे शरद पवारांना राजकीय गुरू मानतात, असं त्यांनी म्हटलं होतं. जर अजित पवार गट शरद पवारांचं मन वळवण्यात यशस्वी झाला तर आम्हाला आनंदच होईल, अशी प्रतिक्रिया दीपक केसरकर यांनी दिली. शरद पवारांचा अनुभव याची मदत आम्हाला सर्वांनाच होईल. आता शरद पवार आपला निर्णय बदलतील का? हे मी नाही सांगू शकत पण आमची पण अपेक्षा आहे की, त्यांनी जर बदलला तर त्याचे स्वागतच करू, असेही केसरकर म्हणाले. अजित पवार गट शरद पवारांची भेट घेतोय, यामध्ये वेगळं काही वाटायचं कारण नाही. शरद पवारांनी आपली भूमिका गट फुटल्यानंतर दोन ते तीन वेळेस स्पष्ट केली आहे. अजित पवारांचा गट हा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा आहे, त्यामुळे त्यांच्या ज्येष्ठ नेत्यांना ते भेटू शकतात त्यात आम्ही बोलणं योग्य नाही. यामुळे महाविकास आघाडीत संभ्रम निर्माण होईल असं वाटत नाही, असे विश्वजित कदम म्हणाले.

## केरळचे माजी मुख्यमंत्री ओमान

माहिती मिळत आहे. २०१९ पासून त्यांची प्रकृती खालावली होती. ओमन चांडी यांना घशाचा आजार झाल्यानं त्यांना उपचारासाठी जर्मनीला नेण्यात आलं होतं. १९७० पासून त्यांनी पुथुपल्ली मतदारसंघाचं विधानसभेत प्रतिनिधित्व केलं. त्यांचे पुत्र चांडी ओम्मान यांनी मंगळवारी पहाटे ५ वाजता सोशल मीडिया पोस्टद्वारे वडिलांच्या निधनाची माहिती दिली.

ओमन चांडी कोट्टायम जिल्ह्यातील त्यांच्या मूळ गावी पुथुपल्ली येथून निवडणूक लढवत होते. त्यांनी सलग १२ वेळा विधानसभा निवडणूक जिंकली. ते एक मास लीडर होते, तसेच, त्यांचा जनसंपर्कही दांडगा होता. त्यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात आयोजित केलेल्या जनसंपर्क कार्यक्रमामुळे शेकडो लोकांच्या प्रलंबित तक्रारींचं त्वरित निराकरण करण्यात आलं.

के करुणाकरण आणि ए के अँटोनी सरकारमध्ये मंत्री म्हणूनही त्यांनी काम केलं आणि वित्त, गृह आणि कामगार खात्यांची जबाबदारी सांभाळली. चांडी यांना २०१८ मध्ये -खउउ सरचिटणीस बनवण्यात आलं होतं. २००६ ते २०११ या काळात त्यांनी केरळ विधानसभेत विरोधी पक्षनेते म्हणूनही काम केलं. चांडी यांच्या पश्चात पत्नी मरियम्मा ओम्मान, मुलगा चांडी ओम्मान आणि मुली मारिया आणि अचू असा परिवार आहे.

## देशात पाच वर्षांत १३.५ कोटी नागरिक

बहुआयामी गरिबी निर्देशांकात आरोग्य, शिक्षण आणि राहणीमानाच्या तीन समान भारित आयामांमध्ये एकाचवेळी गरिबांचे मोजमाप करते. यांमध्ये पोषण, बाल व किशोर मृत्यू, माता आरोग्य, शालेय शिक्षणाची वर्षे, शाळेतील उपस्थिती, स्वयंपाकाचे इंधन, स्वच्छता, पिण्याचे पाणी, वीज, घरे, मालमत्ता आणि बँक खाती या १२ निर्देशांकांचा यामध्ये समावेश होतो.

## हिंजवडीची आयटी कंपनी आली चपळगाववाडीमध्ये, सीएसआर गुंतवला जिल्हा परिषद शाळेमध्ये

अक्कलकोट/प्रतिनिधी : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चपळगाववाडी येथे सिनेक्रान टेक्नॉलॉजीस प्रायव्हेट लिमिटेड यांच्या सीएसआर फंडातून व मॉडेल अॅक्शन फॉर रूरल चेंज,पुणे यांच्या विशेष प्रयत्नातून शाळेत मुलामुलींसाठी स्वतंत्र, अत्याधुनिक शौचालय बांधकाम मंजूर करण्यात आले. त्याचे भूमिपूजन अक्कलकोट तालुका गटविकास अधिकारी मा.सचिन खुडे साहेब, श्री रफिक नदाफ असोसिएट डायरेक्टर सिनेक्रान, श्री सैपन मुजावर, कायदेशीर सल्लागार सिनेक्रान, श्री राजेश आगळे सिनेक्रान, श्री शिवाजी तळेकर संस्थापक अध्यक्ष मॉडेल अॅक्शन फॉर रुरल चेंज, आकाश इंगवले, भीवराज निसर्गवण,अभिजीत जगताप ,उपसरपंच मा.शबाना नदाफ,ग्रामपंचायत सदस्य पंडीत परशेट्टी,गुरुबसप्पा गोविंदे, जावेद नदाफ,माजी सरपंच विश्वनाथ दोड्याळे शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री गौरीशंकर दोड्याळे, उपाध्यक्ष करीम नदाफ, सदस्य मुलका नदाफ, गुडुमाबी नदाफ, इसरत नदाफ,संगीता गोविंदे, गावातील प्रतिष्ठित, ईस्माईल नदाफ,शौकत नदाफ, पैगंबर नदाफ, रामचंद्र गोविंदे, मुख्याध्यापक शिवशरण गोविंदे, सहशिक्षिका,कडलासकर मॅडम, अंगणवाडी




ताई मंगल गोविंदे तसेच बहुतांश पालक,सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी गटविकास अधिकारी श्री सचिन खुडे यांनी सिनेक्रान कंपनीच्या सर्व अधिकारी वर्गाचा सन्मान केला. व शाळेने लोकसहभागातून केलेल्या कामाचे कौतुक केले. यावेळी सिनेक्रान चे असोसिएट डायरेक्टर श्री रफिक नदाफ यांनी शाळेच्या मुलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी कंपनी मार्फत आणखी निधी उपलब्ध करून देण्याची ग्वाही दिली. श्री सैपन नदाफ यांनी पुण्याच्या शाळेतील निधी चपळगाववाडी शाळेकडे वळविला असल्याचे सांगितले. श्री शिवाजी तळेकर यांनी एका महिन्यात सदरचे बांधकाम पूर्ण करणार असे सांगितले. सर्वांनी शाळेच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधून गुणवत्ते बाबतीत समाधान व्यक्त केले.विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून कार्यक्रम समाप्त झाला. सुत्रसंचालन तुकाराम जाधव यांनी तर आभार प्रदर्शन श्रीम. कडलासकर मॅडम यांनी केले.

## राज्यात 'बाल हक्क संरक्षण अधिनियमा'ची प्रभावी अंमलबजावणी करणार : महिला व बालविकास मंत्री तटकरे

मुंबई : राज्य बालहक्क संरक्षण आयोगाच्या माध्यमातून प्रत्येक बालकाच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास करण्यावर भर देण्यात येईल. बालहक्क संरक्षण अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करणार असल्याची ग्वाही महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली.राज्य बालहक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्ष अॅड. सुशिबेन शहा यांनी विधानभवन येथे दिलेल्या भेटीवेळी मंत्री कु. तटकरे बोलत होत्या. यावेळी एकात्मिक बाल विकास विभागाच्या आयुक्त रुबल अग्रवाल उपस्थित होत्या.



महिला व बालविकास मंत्री कु. तटकरे म्हणाल्या की, प्रत्येक बालकाचा सर्वांगीण विकास करून त्यांच्या व्यक्तिमत्वाचा संपूर्ण क्षमतेने विकास करण्यासाठी महिला व बालविकास विभाग विविध योजना राबवित आहे. या योजनांना गती देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. कुपोषण मुक्तीसाठी राबविण्यात येणाऱ्या योजना, बालकांचे संगोपन, सुरक्षित व योग्यरित्या होण्यासाठी काळजी घेण्यात येईल. राज्य बालहक्क संरक्षण आयोगाच्या माध्यमातून बालकांच्या विकासासाठी व जनजागृतीसाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची जास्तीत जास्त माहिती पोहोचवावी. कौटुंबिक वातावरणापासून वंचित असलेल्या बालकांना विशेष संरक्षण आणि मदत मिळण्याचा हक्क देण्यासाठीही महिला व बालविकास अनेक योजना राबवित आहे. या योजनांना अधिक गती देण्यात येईल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.राज्य बालहक्क संरक्षण आयोगाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती आयोगाच्या अध्यक्ष अॅड. शहा यांनी दिली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# अधिस्वीकृती समितीवरील संस्था सदस्यांच्या नियुक्त्या रद्द करा : वसंत मुंडे

## माहिती विभागाच्या अजब कारभाराविरुध्द राज्यभर आंदोलन

मुंबई/प्रतिनिधीः धर्मादाय आयुक्त यांच्याकडे सोसायटी व ट्रस्ट ॲक्ट अंतर्गत नोंदणी असलेल्या सेवाभावी संस्थांना, पत्रकार संघटना गृहित धरुन अधिस्वीकृती समितीवर सदस्य म्हणुन देण्यात आलेल्या नियुक्यात तात्काळ रद्द करा. सेवा भावी संस्था आणि संघटना नोंदणीचे स्वतंत्र कायदे आणि विभाग असताना चुकीच्या पध्दतीने प्रस्ताव मंजूर करणार्या माहिती आणि जनसंपर्क विभागातील संबंधितांची चौकशी करुन कार्यवाही करावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केली आहे. राज्य पत्रकार संघाच्या वतीने सोमवारी राज्यातील सर्व जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आणि जिल्हा माहिती अधिकारी यांना निवेदन देऊन रोष व्यक्त करण्यात आला आहे.



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या नेतृत्वाखाली सोमवार दि. १७ जुलै रोजी राज्यातील सर्व जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आणि जिल्हा माहिती अधिकारी यांना निवेदन देऊन पत्रकारांसाठी असलेल्या अधिस्वीकृती समितीवर नियमबाह्य पध्दतीने धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणी असलेल्या संस्थांचे प्रतिनिधी घेण्यात आले आहेत. माहिती विभागाच्या या अजब कारभाराविरोधात रोष व्यक्त करत आंदोलन करुन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महासंचालकांना निवेदने पाठवण्यात आली आहेत. बीड येथे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी दीपा मुधोळ यांची भेट घेऊन निवेदन सादर केल्यानंतर माध्यमांशी बोलतांना मुंडे म्हणाले, महाराष्ट्र शासनाच्या माहिती आणि जनसंपर्क विभागाने ११ जुलै २०२३ रोजी राज्य अधिस्वीकृती समितीवर २७ आणि ९ विभागीय समित्यांवर ४५ सदस्यांची नेमणूक केली आहे. याच आदेशामध्ये मराठी पत्रकार परिषद या संघटनेवर प्रशासक नियुक्त असल्याबाबत धर्मादाय सहआयुक्त पुणे यांनी कळवले असल्याचे स्पष्ट केले असुन संघटनेचे राज्य समितीवर पाच आणि विभागीय समितीवर नऊ असे १४ सदस्य घेण्यात आलेले आहेत. याच पध्दतीने महाराष्ट्र श्रमिक पत्रकार संघटना तीन, महाराष्ट्र संपादक परिषद दोन, मंत्रालय विधीमंडळ वार्ताहर संघ एक, बृह्नमहाराष्ट्र जिल्हा वृत्तपत्र संपादक संघ एक, महाराष्ट्र दैनिक वृत्तपत्र संघटना एक आणि महाराष्ट्र साप्ताहिक वृत्तपत्र संपादक परिषद एक असे सदस्य घेण्यात आले आहेत.

धर्मादाय आयुक्त यांच्याकडे संस्था नोंदणीसाठी १८६० सोसायटी आणि १९५० ट्रस्ट कायद्यांतर्गत सेवाभावी संस्थांची नोंदणी केली जाते. तर असंघटित क्षेत्रात काम करणार्या मानधन, पगार घेणार्या कामगारांसाठी कामगार कायदा (लेबर युनियन ॲक्ट) १९२६ अंतर्गत नोंदणी केली जाते. सेवाभावी संस्था आणि श्रमिक संघटनांसाठी स्वतंत्र विभाग आणि कायदे असताना माहिती आणि जनसंपर्क विभागासह सामान्य प्रशासन विभागानेही कोणतीही खातरजमा न करता धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणी असलेल्या सेवाभावी संस्थांना संघटना दाखवून चुकीच्या पध्दतीने अधिस्वीकृती समितीवर सदस्यांची नियुक्ती केली आहे.

याची चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करा आणि चुकीच्या पध्दतीने झालेल्या नियुक्त्या रद्द कराव्यात अशी मागणी प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केली आहे. यावेळी ज्येष्ठ संपादक संतोष मानूरकर, बाबा देशमाने, ॲड.शेखर कुमार, व्हाईस ऑफ मिडीयाचे संजय मालानी, बालाजी मारगुडे, संदीप बेदरे, विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी आदिंची उपस्थिती होती.

राज्यातील सर्व जिल्ह्यात आंदोलन करण्यात आले. मुंबईत पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस विश्वास आरोटे यांनी तर मराठवाड्यात विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी, विदर्भात प्रा.महेश पानसे, बाळासाहेब देशमुख आणि अमरावती विभागात नयन मोंढे, उत्तर महाराष्ट्रात प्रविण सपकाळे, खानदेशात किशोर रायसाकडा, कोकण विभागात नितीन शिंदे यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या प्रमाणात आंदोलन झाले.

# अधिस्वीकृती समितीवरील नियमबाह्य नियुक्त्यांविरोधात पत्रकारांचे निफाड तहसीलदार यांना निवेदन

निफाड/ प्रतिनिधी : महाराष्ट्र शासनाने सेवाभावी संस्थांना पत्रकार संघटना म्हणून गृहीत धरून राज्य व विभागीय अधिस्वीकृती समितीवर नियमबाह्यपणे नियुक्ती दिली आहे. ही नियुक्ती रद्द करून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी या मागणीचे निवेदन नाशिक जिल्ह्याच्या वतीने निफाड येथे महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघटनेच्या वतीने तहसीलदार यांना देण्यात आले. महाराष्ट्र राज्य शासनाने शासकीय पत्रकार अधिस्वीकृती समिती नुकतीच गठीत केली असून पत्रकार अधिस्वीकृती समिती गठीत करताना शासनाने सर्व नियम निकष धाब्यावर बसवून सेवाभावी संस्थेला संघटना समजून त्यांच्या प्रतिनिधींना एकतर्फी पत्रकार अधिस्वीकृती समितीमध्ये घेतले



आहे. नियमानुसार पत्रकारांच्या संघटने अंतर्गत पदाधिकारी, पत्रकारांना न घेता सेवा संस्था अंतर्गत नोंदणी असलेल्या तसेच न्यायप्रविष्ठ असलेल्या सेवा संस्थेतील पदाधिकारी असलेल्या पत्रकारांची निवड समितीवर केली आहे. जी की नियमबाह्य आहे. यासंदर्भात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे, प्रदेश सरचिटणीस विश्वासराव आरोटे, प्रदेश संघटक संजयजी भोकरे साहेब व नाशिक जिल्हा अध्यक्ष (ग्रामीण) राजेंद्र जी थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली राहुल सरोदे.गणेश वाघ.लहानु बोरगुडे.बाबुराव वाढवणे संजय जाधव आदी पत्रकारांनी तहसीलदार यांना निवेदन सादर केले.

# अधिस्वीकृती समितीवरील नियमबाह्य नियुक्त्यां रद्द करा

## महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने अधिकार्यांना निवेदन

पंढरपूर/प्रतिनिधीः महाराष्ट्र शासनाने सेवाभावी संस्थांना पत्रकार संघटना म्हणून गृहीत धरून राज्य व विभागीय अधिस्वीकृती समितीवर नियमबाह्यपणे नियुक्ती दिली आहे. अशा नियुक्ती रद्द करून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करीत नियुक्त रद्द करण्यात याव्यात या मागणीचे निवेदन महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघटनेच्या वतीने प्रांताधिकारी, तहसीलदार, उपविभागीय माहिती अधिकारी यांना देण्यात आले.




महाराष्ट्र राज्य शासनाने शासकीय पत्रकार अधिस्वीकृती समिती नुकतीच गठीत केली आहे. पत्रकार अधिस्वीकृती समिती गठीत करताना शासनाने सर्व नियम निकष धाब्यावर बसवून सेवाभावी संस्थेला संघटना समजून त्यांच्या प्रतिनिधींना एकतर्फी पत्रकार अधिस्वीकृती समितीमध्ये घेतले आहे. नियमानुसार पत्रकारांच्या संघटनेचे अंतर्गत पदाधिकारी, पत्रकारांना न घेता सेवा संस्था अंतर्गत नोंदणी असलेल्या तसेच न्यायप्रविष्ठ असलेल्या सेवा संस्थेतील पदाधिकारी असलेल्या पत्रकारांची निवड समितीवर केली आहे.

जी की नियमबाह्य आहे. यासंदर्भात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे, प्रदेश सरचिटणीस विश्वासराव आरोटे, प्रदेश संघटक संजयजी भोकरे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आज पश्चिम महाराष्ट्र कार्याध्यक्ष राजेंद्र कोरके पाटील, शहर अध्यक्ष नागेश आदापुरे, कार्याध्यक्ष सचिन कुलकर्णी, उपाध्यक्ष विनोद पोतदार, सचिव कुमार कोरे, प्रसिद्ध प्रमुख दादा कदम,शहर संघटक संजय यादव, ग्रामीण विभाग अध्यक्ष मनोज पवार, रामदास नागटिळक,रवींद्र कोळी,अश्पाक तांबोळी,अजित देशपांडे आदी पदाधिकारी पत्रकार मंडळी उपस्थित होते.

# स्वेरीच्या ६ विद्यार्थ्यांची मॅग्ना इंटरनॅशनल या ग्रुपच्या 'मॅग्ना सिटींग' या कंपनीमध्ये निवड

## ॲटोमोटीव्ह क्षेत्रातील जगातील सर्वोकृष्ट पहिल्या चार कंपन्यांपैकी ही एक कंपनी


पंढरपूर/प्रतिनिधीः मॅग्रा ग्रुपने 'मॅग्रा सिटींग' या कंपनीसाठी घेतलेल्या मुलाखतीत गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग या विभागातील ६ विद्यार्थ्यांची कॅम्पस इंटरव्युवद्वारे निवड करण्यात आली असून स्वेरीकडून यंदा विद्यार्थ्यांना सहाशे हून अधिक नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.' अशी माहिती संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी दिली.




'मॅग्रा सिटींग' या कंपनीसाठी मॅग्रा ग्रुपच्या माध्यमातून गोपाळपूर येथील इंजिनिअरिंग कॉलेजमधील विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या. या निवड प्रक्रियेच्या अंतिम फेरीतून त्यांनी मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागामधील सुहास नागनाथ नष्टे, बालाजी राजेंद्र पिसे, विक्रम विलास रोंगे, दीप्ती संतोष कदम, स्वप्नाली ज्ञानेश्वर कलुबर्मे व राकेश प्रकाश बिराजदार या ६ विद्यार्थ्यांची निवड केली. स्वेरीच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागाचे माजी विद्यार्थी या कंपनीमध्ये मागील पाच ते दहा वर्षापेक्षा अधिक काळापासून कार्यरत आहेत. त्यांच्या कार्याचा आलेख पाहून कंपनीने स्वेरीच्या विद्यार्थ्यांना या संधी दिल्या आहेत. स्वेरीचे माजी विद्यार्थी प्रत्येक वर्षी प्लेसमेंट व संबंधित गोष्टींमध्ये मोलाचे सहकार्य करत असतात.

त्यांच्या सहकार्यामुळे आज विद्यार्थ्यांना नोकरीच्या चांगल्या संधी मिळत आहेत.१९९८ साली स्थापन झालेल्या स्वेरी अभियांत्रिकी मधून प्लेसमेंटच्या माध्यमातून आजपर्यंत हजारो विद्यार्थ्यांना नोकऱ्या देण्यात आल्या आहेत. स्वेरीचे विद्यार्थी आज विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यात आपले उत्तम करिअर घडवीत आहेत. विद्यार्थ्यांना ट्रेनिंग व प्लेसमेंट विभागामार्फत स्वतंत्रपणे कुशल प्रशिक्षकांद्वारे एप्टीट्युड, कम्युनिकेशन स्कील, टेक्निकल स्कील, विविध सॉफ्टवेअर्स, मॉक इंटरव्युव्ह यांचे प्रशिक्षण दिले जाते. स्वेरीमध्ये वार्षिक परीक्षांचे उत्कृष्ट निकाल, संशोधने, मानांकने, इन्फ्रास्ट्रक्चर याबरोबरच विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा विचार करून करिअरच्या दृष्टीने सर्वात महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या प्लेसमेंटकडे देखील अधिक लक्ष दिले. विद्यार्थ्यांचे परिश्रम, शिक्षकांचे प्रयत्न आणि स्वेरीतील शैक्षणिक कल्चर यामुळेच स्वेरीतील विद्यार्थ्यांना नोकरीच्या भरपूर संधी उपलब्ध होत आहेत आणि त्यातून स्वेरीवर असलेला पालकांचा विश्वास अधिक दृढ होत आहे. विद्यार्थ्यांना स्वेरीकडून दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणामध्ये ॲप्टिट्यूड, कम्युनिकेशन स्किल, एडवॉन्स टेक्निकल ट्रेनिंग, मॉक इंटरव्यूव, ग्रुप डिस्कशन, सॉफ्टवेअर ट्रेनींग या व्यतिरिक्त जागतिक स्तरावर संधी मिळण्यासाठी जापनीज लैंग्वेज ट्रेनींग तसेच जीआरई, टोफेल या संदर्भातील मार्गदर्शन यांचा समावेश आहे. सदर विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील तज्ञ प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. शिक्षण पूर्ण होण्यापूर्वीच विद्यार्थ्यांना नोकरीची संधी उपलब्ध होत असल्याने विशेषतः पालक वर्गात आनंदाचे वातावरण पसरले आहे. संस्थेचे संस्थापक सचिव व प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख तसेच संस्थेचे विश्वस्त व पदाधिकारी, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्यासह पालकांनी 'मॅग्रा सिटिंग' या कंपनीमध्ये कॅम्पस इंटरव्ह्यूमधून निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## शब्दकोडे क्र ६२



आडवे शब्द १. वस्त्र ३. त्याप्रमाणे ५. अशा माणसाकडे काहीही काम सोपवू नये ११. निश्चय १२. डोळ्याच्या उघड्या पृष्ठभागावरील पारदर्शक आवरण १४. पुन्हा १५. कधीही पोळे न सोडणारी १६. मुक्काम १८. ओसाड, वैराण १९. पौर्णिमा २०. लेखणीचा आधुनिक प्रकार २१. वेल २३. साडीच्या खालच्या भागाला लावलेली अस्तराची किनार २४. बाव, झावळीच्या पातीमधील काडी २५. सूर्यास्ताआधी २७. लक्ष – पण भान नाही २९. तोरा ३२. आवरण ३५. पदवी ३६. सूट ३७. सर्वात लहान ३९. सर्वात मिळून, सर्वांचे ४०. अपुरा ४२. रोटीचा प्रकार ४३. गोष्ट ४४. तीव्र लोभ ४५. सत्तेवर आलेला ४८. आर्जवे ५०. भित्रा ५२. डुक्कर ५४. दुधी भोपळ्याचा गोड पदार्थ ५६. चांदी ५८. सैनिक ६०. सुळका ६१. पृथ्वी ६३. व्यायामप्रकार, अवघड कामगिरी ६४. शहाणपण यावर अवलंबून नसते ६६. लिंबाची निरूपयोगी जात ६७. एकाच वेळी, अचानक ६९. अंत:करण ७१. शेवट ७३. जोग धबधबा या नदीवर (कर्नाटक) आहे ७४. सहजगत्या ७६. वेग ७९. हक्क सांगणे ८१. प्रमाद ८३. लहान मुलाची तुमान ८४. गुंड ८५. टेंभा ८७. बंदुकीने केलेला हल्ला ९१. चोप ९३. इंद्राची पत्नी ९४. सावध ९७. स्वच्छ ९८. ऋण ९९. अंदाज १००. एक शेंगभाजी १०२. गंध, परिमल १०४. टिंगल १०५. राजस्थानी स्त्रियांच्या पेहरावातील नक्षीचा घोळदार परकर १०६. घाणेरडे १०७. टोकदार १०८. श्रम १०९. ऋषी

उभे शब्द १. स्थापनादिवस २. हा प्राणी स्वत:चा रंग बदलू शकतो ३. पोहण्यासाठी बांधलेला तलाव ४. सर्प ५. शंकराचे प्रिय फळ ६. पूर्वज ७. माळजमीन ८. दंत ९. 'अपराध मीच केला, शिक्षा तुझ्या कपाळी.....' १०. विलंब, दिरंगाई १३. डोक्याचा केस गळून गेलेला भाग १५. जंगल १७. दूरचा फेरा ह्व बहुदा उगाच पडणारा १९. रोमांच २२. लकेर २६. विधानातील स्पष्ट विसंगती २८. आजीच्या जमान्यातील बिनविजेचा मिक्सर–ग्राईंडर! ३०. परिमार्जन ३१. अतिशय हानिकारक ३३. व्रत ३४. कमळ, मुलाचे एक नाव ३५. सज्जन ३६. डोंगराच्या माथ्यावरील सपाट जमीन ३८. राजवाडा ४१. कौशल्य ४२. स्त्री ४५. प्रारब्धदेवता ४६. प्रवाह ४७. तुरूंग ४८. कुरळे केस ४९. अभिमानास्पद ५१. फुलातील पराग ५२. साबुदाण्याचा तळीव पदार्थ ५३. आक्षेप ५५. श्रीकृष्णाच्या जीवावर उठलेली मावशी ५७. युद्धातील यश ५९. गुडघ्यापासून घोट्यापर्यंतचे हाड ६०. मान्य ६२. हाक ६५. कलिका ६८. चिलट ६९. तनू ७०. सर्वांना ठाऊक झालेले ७२. जर, जेव्हा ७५. स्थूल ७७. किनारा ७८. किरकोळ, फालतू ८०. डावा ८१. शेगडी ८२. ताकद ८६. विज्ञान ८७. अडचण ८८. बडबडगीतांची शाळा ८९. मृदंग ९०. शर्विलक ९१. मत्स्य ९२. स्वातंत्र्य ९३. साखर ९५. सार्वजनिक वाहतुकीचे अवजड वाहन ९६. मोठी सुई ९९. सुदृढ, मजबूत १००. निवृत्तीनाथांचे गुरु, नऊ नाथांपैकी एक १०१. कुमक १०३. पूर्व दिशा

# स्वामींनी दर्शनाचे भाग्य दिले : प्रियंका लद्दे यांचे प्रतिपादन

अक्कलकोट/प्रतिनिधीः ब्रम्हांडनायक अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थ महाराज हे माझे वंदनीय गुरु आहेत. परमार्थाची शिकवण हे स्वामी समर्थांच्या जीवन चरित्रावर दृष्टीक्षेप टाकल्यास कळते. त्यामुळे स्वामींची भक्ती या मनुष्य देहात संचारावी लागते.

स्वामी कृपेने अशी स्वामी भक्ती आमच्या मनुष्य देहात संचारली आहे. त्यामुळे स्वामी समर्थांनी सुद्धा आज आम्हाला स्वामी दर्शनाचे भाग्य दिले असल्याचे प्रतिपादन लातूर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या महिला जिल्हाध्यक्षा प्रियंका लद्दे व शेखर लद्दे यांनी केले. ते नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास सहकुटूंब भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांनी प्रियंका लद्दे व शेखर लद्दे यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सन्मान केला. याप्रसंगी प्रियंका लद्दे बोलत होत्या. पुढे बोलताना लद्दे यांनी श्री स्वामी समर्थांच्या कृपेने जीवनात आणखी समाज कार्य करण्याची संधी मिळत रहावी असे सांगून मंदिर समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांनी माझ्यासह माझ्या कुटूंबास स्वामी समर्थांच्या सत्काररुपी आशीर्वादाने एक प्रकारे प्रेरणा देण्याचे कार्यच इंगळे यांनी केले आहे त्याबद्दल त्यांचे मी ऋणी असून त्यांचे आभार मानावे तितके कमीच आहेत असेही भावोद्गार लद्दे यांनी याप्रसंगी काढले यावेळी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, संपतराव शिंदे, संजय पवार, प्रसाद सोनार, सागर गोंडाळ, श्रीकांत मलवे, चंद्रकांत कवटगी,



काशिनाथ इंडे, स्वामीनाथ लोणारी, गिरीश कासेकर व रुद्रय्या स्वामी इत्यादी उपस्थित होते.

# ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत,कवी,बाबुराव बागुल यांच्या जयंतीनिमित्त कवी संमेलन



नाशिक/प्रतिनिधी : पुष्परत्न साहित्य समूह नाशिक आयोजित आहिरे स्पर्धा परीक्षा अकॅडमी नाशिक येथे जेष्ठ साहित्यिक, विचारवंत,कवी बाबुराव बागुल यांच्या जयंतीनिमित्त कवी संमेलन मोठ्या उत्साहात संपन्न झाले.या संमेलनाचे अध्यक्ष यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे प्रा. नागार्जुन वाडेकर व प्रमुख पाहुणे प्रा.डॉ.आनंद आहिरे हे होते.सुरुवातीला अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांना मानाची शाल सन्मानपत्र व पुस्तक देऊन स्वागत केले त्यानंतर लावणीकार रविकांत शार्दुल नाशिक यांना पुष्परत्न काव्य गौरव पुरस्कार सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला व सुप्रसिद्ध गझलकार गुलाब राजा फुलमाळी पुणे यांचा यथोचित सन्मान केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पुष्परत्न साहित्यसमूहाचे अध्यक्ष प्रा.डॉ.आनंद रत्नाकर आहिरे यांनी केले. सुरुवातीला सर्वांचे धन्यवाद व्यक्त केले. त्यानंतर त्यांनी बाबुराव बागुल व त्यांची साहित्य संपदा उलगडून सांगितली प्रा.डॉ. आनंद आहिरे सन २००८ साली मुंबई विद्यापीठात पदवीला असताना त्यांना विशिष्ट लेखक अभ्यास बाबुराव बागुल हे होते. त्यामुळे बाबुराव बागुलांना भेटण्याचा व त्यांचा अभ्यास संपूर्ण जाणून घेण्याचा योग आला होता त्यामुळे त्यांचे लेखन हे रंजक नसून परिवर्तनाचे होते. कारण बाबुराव बागुल यांच्या लेखनाच्या केंद्र वरती तथागत भगवान गौतम बुद्ध डॉ. बाबासाहेब आंबेडकर,महात्मा ज्योतिबा फुले,कार्ल मार्क्स होते. तसेच विविध महापुरुष, संत होते म्हणून समाजातील तळागाळातील, बहुजनांचे स्त्रियांचे,बाबुराव बागुलांनी कविता, कथा, कादंबरी व वैचारिक लेखनातून वाचकांना अंतर्मुख केले आहे तसेच परिवर्तनही घडून आणले आहे.बाबुराव बागुल यांची लेखनाची भाषा ही काळजाला भिडणारी आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. नागार्जुन वाडेकर यांनी बाबुराव बागुल यांच्या लेखनाची दखल जगाने घेतलेली आहे त्यांचे लेखन हे केवळ महाराष्ट्रासाठी नसून संपूर्ण भारतातील विविध वर्गांसाठी होते. तसेच बाबुराव बागुलांचे विविध वर्णन विविध पाश्चात्य व भारतीय लेखकांनी कोणकोणत्या पद्धतीने केले आहे. हे या ठिकाणी नमूद केले.

पुणे व नाशिक जिल्ह्यातील ३४ च्या वरती विविध ठिकाणाहून कवी, कवयित्री या संमेलनासाठी उपस्थित होते. कवी व कवयित्रींनी बाबुराव बागुल यांच्या वेदाआधी तू होतास या कवितासंग्रहातील विविध कवितांचे अभिवाचन केले. त्यामध्ये सहभागी कवी,कवयित्री, बालकवी, प्रशिक थोरात,रविकांत शार्दुल ,अरुण घोडेराव, गुलाब राजा फुलमाळी,संजय आहेर,सीमा राणी बागुल, डॉ. सुनिता वाघमारे,प्रशिक सोनवणे ,राजू रसाळ,साहिल गांगुर्डे सोमनाथ गायकवाड, सुभाष उमरकर, सुनंदा पाटील,रचना चिंतावार, राजेंद्र चिंतावार, लोकनाथ जाधव, काशिनाथ वेलदोडे, करुणा वाडेकर, रामचंद्र शिंदे, अलका दराडे, वैजयंती सिन्नरकर, संदीप साठे, कारभारी मोरे,योगेश जाधव, आदींनी अतिशय आशयपूर्ण व सूत्रबद्ध पद्धतीने बाबुराव बागुल यांच्या कवितांचे अभिवाचन केलेसंपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कवी अरुण घोडेराव नाशिक ज्येष्ठ कवी बाबुराव बागुल यांचे विविध संदर्भ देत अतिशय सूत्रबद्ध पद्धतीने केले.

# मंत्री अतुल सावे यांनी घेतला गृहनिर्माण विभागाचा आढावा



मुंबई : गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांनी आज गृहनिर्माण विभागाचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी त्यांनी गृहनिर्माण विभागाच्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले.

मंत्रालयातील परिषद सभागृहात आज दुपारी आयोजित केलेल्या या बैठकीस यावेळी गृहनिर्माण विभागाच्या अपर मुख्य सचिव वल्सा नायर सिंह, प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी सतीश लोखंडे, उपसचिव अजित कवडे यांच्यासह गृहनिर्माण विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.मंत्री श्री. सावे म्हणाले की, गृहनिर्माण विभागाच्या माध्यमातून विविध योजना राबविण्यात येतात. पात्र, झोपडपट्टीधारकांच्या पुनर्वसनासाठी राज्य शासनाने कायदे व अधिनियम केले आहेत. त्या माध्यमातून झोपडपट्टीधारकांच्या पुनर्वसनासाठी असलेल्या विविध योजनांची गतीने अंमलबजावणी करावी. झोपडीधारकांची पात्रता जलदगतीने निश्चितीसाठी व कामात पारदर्शकता आणण्यासाठी स्वयंचलित परिशिष्ट- २ प्रणालीचे काम त्वरित सुरू करावे.

रखडलेल्या योजनांच्या पूर्ततेसाठी अभय योजना, निविदा प्रक्रियेचा अवलंब करून विकसकाची नियुक्ती झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण आणि 'म्हाडा'च्या संयुक्त उपक्रमात झोपडपट्टी पुनर्वसन योजनांची अंमलबजावणीची कार्यवाही करावी. रद्द केलेल्या योजनांना गती मिळण्यासाठी सुनावणीची प्रक्रिया पूर्ण करावी, असेही मंत्री श्री. सावे यांनी सांगितले. यावेळी मंत्री श्री. सावे यांनी गिरणी कामगारांना प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत द्यावयाची घरकुले, बीडीडी चाळींचा पुनर्विकास, 'म्हाडा'च्या योजना, महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, झोपडपट्टी पुनर्वसन योजनांची सद्य:स्थिती, गेल्या वर्षभरात घेण्यात आलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची सविस्तर माहिती घेत त्यांनी योजनांमधील अडचणी जाणून घेतल्या. अपर मुख्य सचिव वल्सा नायर सिंह, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. लोखंडे यांनी गृहनिर्माण व झोपडपट्टी पुनर्विकासाच्या योजनांची सविस्तर माहिती दिली.



# नळदुर्ग येथे पत्रकार शोएब काझी यांचा सत्कार व पत्रकार संघाचे ओळख पत्राचे वाटप कार्यक्रम संपन्न

वागदरी/एस.के.गायकवाड : नळदुर्ग येथील युवा पत्रकार शोएब ईरफान काझी यांनी पत्रकारिता पदवी संपादन केल्या बद्दल त्यांचा महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई तालुका शाखा तुळजापूरच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पत्रकार संघातील सर्व सभासद व पदाधिकारी याना ओळख पत्राचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे उस्मानाबाद जिल्हा कार्याध्यक्ष भैरवनाथ कानडे हे होते तर प्रमुख पाहूणे म्हणून जेष्ठ पत्रकार राजेंद्र स्वामी, परिवर्तन सामाजिक संस्थेचे सचिव मारूती बनसोडे, अणदूर सोसायटी चे व्हाईस चेअरमन राजेश देवसिंकर, डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मिडीयम स्कूलचे संस्थापक मारुती खारवे, आदी होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे तुळजापूर तालुका अध्यक्ष अरुण लोखंडे यांनी केले तर सुत्रसंचलन पत्रकार संघाचे तालुका सल्लागार एस.के.गायकवाड, यांनी केले. या प्रसंगी युवा पत्रकार शोएब ईरफान काझी यांनी पत्रकारिता पदवी संपादन केल्या बद्दल त्यांचा महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ तालुका शाखा तुळजापूर च्या वतीने उपस्थित मान्यवरांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला. तसेच उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ तुळजापूर तालुका शाखेच्या सर्व सभासद व पदाधिकारी याना संघाचे ओळखपत्र वाटप करण्यात आले. यावेळी पत्रकार संघाचे सुनील माळगे, संजय पिसे,शामकांत नागीले,किशोर धुमाळ,नागेश करपे,प्रा.भास्कर वाघमारे, उशेन सय्यद आदी उपस्थित होते.

# डोक्यात रॉड मारून एका शेतकऱ्याची हत्या

सोलापूर/प्रतिनिधी : डोक्यात रॉड मारून एका शेतकऱ्याची हत्या झाल्याची धक्कादायक घटना पंढरपुर तालुक्यातील अनवली येथे घडली. आबासाहेब मारुती मिटकरी (वय ५५, रा. अनवली, ता. पंढरपूर) असे खून झालेल्या शेतकऱ्याचे नाव आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, मयत अभिमान मेटकरी हे रविवारी अनवली येथील जनावरांच्या बाजारात जातो असे सांगून घरातून बाहेर पडले होते. ते रात्री घरी आलेच नाहीत. घरच्यांनी तात्काळ पंढरपूर ग्रामीण पोलिसांना याबाबतची कल्पना दिली. शिवाय कुटुंबियांनी रात्रभर पंढरपूर शहराबरोबरच परिसरातील अनेक गावात शोधाशोध केली.

दरम्यान, पोलिसांकडून शोध घेत असतानाच सोमवारी सकाळी त्याचा मृतदेह आढळून आला. डोक्यात रॉडने मारून त्यांची हत्या झाली असावी अशी प्राथमिक माहिती पोलिसाकडे आली आहे. अधिकचा तपास पंढरपूर पोलिस करीत आहेत. सध्या त्या शेतकऱ्याचा मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रूग्णालयात पाठविण्यात आले आहे.

# स्थानिक गुन्हे शाखा, सोलापूर ग्रामीण यांची धडाकेबाज कामगिरी

## एक खुनासह दरोडा व दोन दरोडयामधील मागील १५ वर्षा पासुन अस्तित्व लपवुन राहणारा पाहिजे आरोपी जेरबंद..



सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूर ग्रामीण जिल्हयातील पाहिजे आरोपी पकडण्याकरीता शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण यांनी सुरेश निबांळकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, सोलापूर ग्रामीण यांना सुचना दिल्या होत्या.

सदर सुचने प्रमाणे सुरेश निंबाळकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी गुन्हे शाखेकडील पथक प्रमुख व त्यांचा पथकास पाहिजे आरोपीस जेरबंद करणेबाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे पोलीस उप-निरीक्षक, सुबोध जमादाडे व त्यांचे पथक मंगळवेढा पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग करीत बोराळे येथे आले असता, गोपनीय बातमीदार मार्फत बातमी मिळाली की, दरोडयातील पाहिजे आरोपी हा सिध्दापूर येथुन बोराळे गावाकडे त्याची काळे रंगाची हिरो होंडा शाईन मोटार सायकल वरुन येणार आहे. सदर बातमी प्रमाणे पोउपनि/ जमदाडे व त्यांचे पथकाने सिध्दापूर ते बोराळे जाणा-या रस्त्यावर सापळा रचुन पाहिजे आरोपीत यास ताब्यात घेतले. सोलापूर जिल्हयातील पाहिजे आरोपीचे अभिलेख पडताळणी करता सदर आरोपीत हा खालील गुन्हयात पाहिजे आरोपी असल्याचे निष्पन झाले.

१) मंगळवेढा पोलीस ठाणे गुरंन १६२/२०१३ भादंवि क. ३९५, ३९७, ४२०, १२०ब, २) मंगळवेढा पोलीस ठाणे गुरंन ९७/२०१०, भादंवि क. ३९८, ४०२. ३) मंगळेवढा पोलीस ठाणे गुरनं १६१/ २००९ भादंकिव क. ३२६, ३२३, ५०४, ५०६. ४) मंद्रुप पोलीस ठाणे गुरनं ३३/२००७ भादंवि कं. ३९६, ३९७.

सदर आरोपीतास पुढील कारवाई करीता मंगळवेढा पोलीस ठाणे यांच्या ताब्यात दिले असुन पुढील तपास मंगळवेढा पोलीस करीत आहे.सदर आरोपी हा रेकॉर्ड वरील आरोपी असुन त्याचे विरुध्द खुनासह दरोडा, दरोडा, फसवणुक सारखे वरील प्रमाणे गंभीर गुन्हे दाखल आहेत. नमुद गुन्हयामध्ये अटक टाळण्यासाठी आरोपी हा मागील १५ वर्षा पासुन त्याचे अस्तित्व लपविण्याकरीता वेगवेगळया ठिकाणी राहत असे.

सदर उल्लेखनीय कामगिरी शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण व हिम्मत जाधव, अपर पोलीस अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली सुरेश निंबाळकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा सोलापूर ग्रामीण यांचे नेत्तृत्वाखाली पोलीस उप-निरीक्षक सुबोध जमदाडे, सहाफौज/घोळवे, पोहवा/परशुराम शिंदे, मपोना/पल्लवी इंगळे, पोकॉ/अजय वाघमारे, अन्वर अत्तार, यश देवकते, सुरज रामगुडे, मपोकॉ/झळके, चापोहवा/प्रमोद माने, यांनी केली आहे.

# शिष्यवृत्ती परिक्षेत जयवंत बागल राज्यात दहावा

## राज्यस्तरीय गुणवत्ता यादीत ग्रामीण विभागातून मिळाले यश

पंढरपूर/प्रतिनिधी : खिलारवाडी विदयालय खिलारवाडी, तालुका पंढरपूर येथील विद्यार्थी पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परिक्षेत जयवंत बागल राज्यात १० वा.आला असल्याचे शाळेच्या वतीने सांगण्यात आले. महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परिक्षा इयत्ता ५ वी या परिक्षेत खिलारवाडी विद्यालयातील विजयसिंह रामचंद्र बागल यांचे चिरंजीव जयवंत विजयसिंह बागल यांनी राज्यस्तरीय गुणवत्ता यादीत ग्रामीण विभागातून महाराष्ट्र राज्यात १० वा. क्रमांक पटकवला आहे. या परिक्षेत ९०.६६ % गुण मिळवुन यश संपादन केले आहे. या उज्वल यशाबद्दल शरदचंद्रजी पवार शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक प्रा. सुखदेवराव चव्हाण सर, मुख्याध्यापक, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थ्याचे आईवडील ,खिलारवाडी गावातील सर्व ग्रामस्थ या सर्वांच्या वतीने विदयार्थ्यांचे अभिनंदन व सत्कार करण्यात आला.



# रिपाईंच्या वतीने अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयाचे नुतन वैद्यकीय अधीक्षक डॉ रवींद्र बनसोडे यांचा सत्कार



अक्कलकोट/प्रतिनिधीः अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयाचे नुतन अधिक्षक म्हणून डॉ.रवींद्र बनसोडे यांनी सोमवारी पदभार स्वीकारला.यावेळी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे अक्कलकोट तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी बोलताना अविनाश मडिखांबे म्हणाले की तत्कालीन वैद्यकीय अधीक्षक डॉ अशोक राठोड यांनी त्यांच्या कार्यकाळात अतिशय बिकट परिस्थितीत कोरोना महामारीच्या वेळी चांगल्या आरोग्यासाठी आवश्यक असणाऱ्या यंत्रणा राबवून त्यांच्या सहकाऱ्यांना विश्वासात सोबत घेऊन अक्कलकोट शहर व तालुक्यातील रुग्णांना चांगल्या प्रकारे आरोग्य सेवा देऊन रुग्णांची सेवा करण्याचे चांगले काम राठोड सरांनी केली आहे

राठोड सरांची बदली मंदृप येथे झाल्याने त्यांचा देखील सत्कार करुन पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आले .तसेच ट्रामा सेंटर चालू करण्यासाठी शासनदरबारी नेहमीच प्रयत्नशील राहिले.ग्रामीण रुग्णालयाचा चेहरा मोहरा बदलण्यात राठोड यांचा सिंहाचा वाटा आहे असे सांगितले. नुतन वैद्यकीय अधीक्षक डॉ.रवींद्र बनसोडे यांनी लवकरात लवकर ट्रामा सेंटर चालू करण्यासाठी शासनदरबारी पाठपुरावा करून रुग्णांना सेवा पुरवण्यासाठी प्रयत्न करावे असे आवाहन अविनाश मडिखांबे यांनी केले.यावेळी रिपाइं शहर अध्यक्ष अजय मुकनार,युवा नेते ननु कोरबु, उदय सोनकांबळे,शकील नाईकवाडी,शुभम मडिखांबे,इरफान कोरबू,इस्माईल आळंद, आदी उपस्थित होते



# मुंबई येथे होणाऱ्या आंदोलनाची दिशा ठरवण्यासाठी जोरदार मीटिंगला टाकळीवाडी मध्ये उस्फूर्त प्रतिसाद

टाकळीवाडी /नामदेव निर्मळेः टाकळीवाडी तालुका शिरोळ येथे माजी सैनिक महात्मा गांधी तंटामुक्त अध्यक्ष विद्यमान केंदबा कांबळे यांनी आयोजित केलेल्या मार्गदर्शनाखाली व वंचित बहुजन आघाडी तर्फे आयोजित करण्यात आलेल्या टाकळीवाडी येथे अतिक्रमण धारक संदर्भात चर्चा करण्यासाठी व २० तारखेला होणाऱ्या महामोर्चा संदर्भात चर्चा करण्यात आली.

यावेळी जिल्हा कोषाध्यक्ष प्रकाश कांबळे, तालुका अध्यक्ष संदीप कांबळे, तालुका महासचिव विश्वास शिंगे, सचिव उदय कांबळे, सहसचिव अतिक पटेल व उपस्थित ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. माणिक कांबळे, अनिल कांबळे, नंदकुमार कांबळे, दादासो खोत, रमेश निर्मळे, मोहन निर्मळे, दिनकर कांबळे, लक्ष्मण भमाणे, बाळू शिंदे, सचिन माळगे, रमेश कांबळे, अशोक बिरणगे,सर्व आजी-माजी सैनिक मोठ्या संख्येने व ग्रामस्थ हजर होते.